सकाळ

२ TODAY

सकाळ : पुणे जिल्हा
रविवार, १७ ऑक्टोबर २०१०

# ज्ञानामुळे जगाचा दृष्टिकोन बदलला

## बारामतीतील कार्यक्रमात शरद पवार यांचे प्रतिपादन

**बारामती, ता. १६ :** नवीन पिढीच्या ज्ञान संपादन करण्याच्या भूमिकेमुळे अमेरिकेसह संपूर्ण जगाचा भारताकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक झाला आहे, ही समाधानाची बाब आहे, असे प्रशंसोद्गार केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी काढले. विद्या प्रतिष्ठान संस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित समारंभात ते बोलत होते.

या प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष विनोदकुमार गुजर, सचिव द. रा. उंडे, खजिनदार रमणिक मोता, सुनेत्रा पवार यांच्यासह संस्थेचे विश्वस्त डॉ. एम. आर. शहा, हरिभाऊ देशपांडे, एकनाथराव जाधव यांच्यासह प्राचार्य, मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री. पवार म्हणाले, की विद्या प्रतिष्ठानला तब्बल ३८ वर्षे पूर्ण झाली यावर विश्वासच बसत नाही. बारामतीत इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाची सोय हवी, अशी मागणी त्या काळातील ज्येष्ठांनी केली. आपणच ही संस्था उभी करावी, अशी भूमिकाही मांडली. शैक्षणिक गुणवत्तेविषयी पालक व समाजाच्या मनात निर्माण झालेल्या सर्व शंका दूर करून विद्या व गुणवत्ता यांचा सन्मान करण्याच्या भूमिकेतूनच विद्या प्रतिष्ठान या संस्थेची स्थापना झाली. खुशालभाऊ छाजेड, धों. आ. सातव, श्रीपालकाका मुथा आदी मान्यवरांची आज आठवण झाल्याखेरीज राहत नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शैक्षणिक चळवळ उभारण्याचे काम महाराष्ट्राने केले, शिक्षणाबाबत सुरवातीपासूनच राज्याची भूमिका नेहमीच आग्रही राहिली, हे महाराष्ट्राचे एक वैशिष्ट्य म्हटले पाहिजे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राज्यात शेकडो शैक्षणिक संस्थांची निर्मिती झाली ही बाब विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची म्हटली पाहिजे.

पैशांसोबत ज्ञानाला येणारे महत्त्व आता मोलाचे समजले जाते. शिक्षकांनीही निरंतर ज्ञान संपादन करण्याचे काम करून मिळालेले ज्ञान मुक्तहस्ताने विद्यार्थ्यांना देण्याची भूमिका ठेवायला हवी. ज्ञानावर आधारित संपत्तीचा होणारा विस्तार ही बाब अत्यंत दिलासादायक आहे.